जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 OCT 2018

Times of India

# SUK mulls launching satellite centres in remote areas

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) is planning to launch satellite centres in remote areas under its jurisdiction. The centres will play an important role in providing education to the students residing in these areas via digital mode. The proposal has been included in the perspective plan of the varsity.

The areas include Chandgad and Shahuwadi taluka in the Kolhapur district, Man taluka in Mahabaleshwar and and Kharoshi village in Satara.

D T Shirke, pro-VC, SUK, told **TOI**, "The state government will elaborate on how to start and operate the satellite centres. As of now, we have finalised the locations for the same. All the locations have been mentioned in the year 2019-2024 perspective plan, which has been submitted to the state government."


He said, "According to the Maharashtra Public Universities Act, 2016 and the state government policies, it has been proposed that the places in the tribal, backward, and hilly areas should have satellite centres for students in such areas. The guidelines are being framed by the state government."

He further said that there are many remote places in the state where it is difficult to get the transportation, mobile or basic connectivity. The state government has proposed that such places can have a satellite centres, the responsibility for which can be given to the nearby college. The experts from the nearby institutes can digitally or in-person educate students.

"Since the project is being launched as a pilot project, we cannot straightaway offer degree courses. It should always start with the basic courses — certificate and diploma courses. We have to evaluate its response. Whether the college, to which the responsibility is given, is getting successfully imparting education among students and whether there is scope for degree courses can be evaluated later," he said.

According to Shirke, since there is no clarity on the satellite centres' policies, they are awaiting for the same from the government.

"We are expecting to get clarity on the satellite centres by the end of March 2019. If everything goes well, we might start centres in the proposed areas from 2019-2020 academic year as well," he added.



## Importance

- Centres proposed in the tribal,hiily and remote areas
- Nearby colleges can take the responsibility of offering education to the students in these areas
- In the beginning, certificate courses are likely to be started and degree courses could be offered after evaluation
- State government to define guideline by March 2019

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2018
तरूण भारत



कोल्हापूर : सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनमध्ये सहभागी झालेले एनसीसी अधिकारी व विद्यार्थीनी.

# ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनमध्ये 'सर्जिकल स्ट्राईक' दिन

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान हद्दीत घुसून, सर्जिकल स्ट्राईक करून, अतिरेक्यांचा खात्मा केला. २९ सप्टेंबर हा शौर्यदिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय जवानांसाठी ही बाब अभिमानस्पद आहे. या विजयादिनानिमित ,शनिवारी शिवाजी विद्यापीठ परिसरातील, एनसीसी भवनमधील, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनमध्ये हा दिन साजरा करून,रॅली काढण्यात आली. यावेळीकमाडींग ऑफिसर कर्नल साईकिया यांनी, आपल्या सैन्य दलात आलेले अनुभव व्यक्त करुन कॅडेटचे मनोबल वाढवले. सहयोगी अधिकारी थर्ड ऑफिसर वर्षा म्हस्के यांनी,सर्जिकल स्ट्राईक विषयीची माहीती दिली.

शहरातील विविध हायस्कूलमधील ४५० कॅडेट यामध्ये सहभागी झाले होते. सकाळी एनसीसी भवन येथून कॅडेटची रॅली काढण्यात आली. एनसीसी भवन, सायबर कॉलेज परत एनसीसीभवन येथे रॅलीची सांगता झाली. यावेळी जीसीआय निशा भोसले व सोनिया यादव, एनसीसी अधिकारी कॅप्टन सुनंदा कदम, चिफ ऑफिसर राजेश्वरी शिरदवाडे, उज्वला पाटील, सुभेदार मेजर नांगरे, विविध हायस्कूलमधील विद्यार्थी क्रडेट सहभागी झाले होते.

पुढारी

# शहीद जवान, पोलिस कुटुंबीयांसाठी मोफत उच्च शिक्षण

## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचा निर्णय

**इस्लामपूर : प्रतिनिधी**

लष्कर सेवा, सीमा सुरक्षा दल व पोलिस दलासारख्या क्षेत्रातील शहीद जवानांच्या कुटुंबीयांना आधार देण्याच्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यापुढे अशा कुटुंबीयांतील पत्नी व पाल्यांना शिवाजी विद्यापीठ कॅम्पसमधील सर्व पदवीपूर्व-पदवी व पदव्युत्तरचे शिक्षण वसतिगृहासह पूर्णपणे मोफत दिले जाईल, अशी माहिती विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य अ‍ॅड. धैर्यशील पाटील यांनी दिली.

इस्लामपूर येथे मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्यावतीने आयोजित 'सर्जिकल स्ट्राईक'च्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त ते बोलत होते. भारतीय लष्कराने पाकव्याप्त काश्मीरमध्ये घुसून केलेल्या कारवाईला (सर्जिकल स्ट्राईक) २ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने या दोन्ही महाविद्यालयांनी संस्थेच्या एस. डी. पाटील सेमिनार हॉलमध्ये भारतीय लष्कर सेवेत असणाऱ्या सैनिकांचा सत्कार व सैनिकांना पुस्तके संच प्रदान कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अ‍ॅड. धैर्यशील पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने भारतीय लष्कर सेवा, सीमा सुरक्षा दल, पोलिस दल अशा संरक्षण क्षेत्रातील शहीद जवानांच्या पत्नी व पाल्यांसाठी पूर्णपणे मोफत उच्च शिक्षणाचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये असणाऱ्या सर्व शाखातील पदवीपूर्व, पदवी व पदव्युत्तर शिक्षण, वसतिगृह अशी सर्व पूर्णपणे मोफत सुविधा देण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे. भारतीय लष्करातील सैनिकांना मराठी भाषेतील पुस्तके तिथल्या ग्रंथालयातून उपलब्ध होण्यासाठी इस्लामपुरात सुरू झालेल्या वाचन चळवळी अंतर्गत या कार्यक्रमात जवान अमोल शिंदे, प्रकाश घाटगे, विनायक लोहार यांनाही पुस्तके देवून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या जवानांनी आपल्या मनोगतात राष्ट्रनिष्ठा व त्यासाठी घेत असलेल्या खडतर परिश्रमाची, तिथल्या प्रतिकूल परिस्थितीच्या आठवणी सांगितल्या.

सकाळ

# कबड्डी स्पर्धा शिवाजी विद्यापीठात

## फुटबॉल मुंबईला, बॅडमिंटन पुण्याला, क्रिकेट बेळगावात

दीपक कुपन्नावर : सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. ३० : अखिल भारतीय विद्यापीठ महासंघाने यंदाच्या आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या अंतर्गत शिवाजी विद्यापीठात विभागीय कबड्डी स्पर्धा होणार आहेत. फुटबॉल विभागीय व आंतरविभागीय स्पर्धांचे मुंबईला, बॅडमिंटन स्पर्धेचे पुण्याला, तर क्रिकेट स्पर्धेचे बेळगावला यजमानपद मिळाले आहे. यंदा विद्यापीठ स्तरावर खेलो इंडिया स्पर्धा होणार असल्याने सर्व क्रीडा प्रकार डिसेंबरअखेर घेण्याची सूचना महासंघाने केली आहे.

दरवर्षी विद्यापीठस्तरीय खेळाडूंच्या कौशल्याला संधी देण्यासाठी आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. विद्यापीठअंतर्गत विभाग आणि आंतरविभागीय स्पर्धेतून विद्यापीठाचा संघ निवडला जातो. हा संघ विभागीय अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभागी होतो. यातील अव्वल चार संघांना आंतरविभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत थेट प्रवेश दिला जातो. जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठीही या स्पर्धेतून खेळाडू आणि संघ निवडले जातात. शासकीय नोकरीसाठीही विद्यापीठ स्तरावरील प्रमाणपत्रे ग्राह्य मानली जात असल्याने अलीकडे अशा स्पर्धेत खेळाडूंचा सहभाग वाढला आहे.

### डिसेंबरअखेर मुदत

**१२ ते २४ जानेवारी २०१९ दरम्यान आंतरविद्यापीठ खेलो इंडिया स्पर्धा होणार आहे. १८ प्रकारांत होणाऱ्या या क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी वेळ मिळावा म्हणून डिसेंबरअखेर सर्व आंतरविद्यापीठ स्पर्धा पूर्ण करण्याच्या सूचना विद्यापीठ महासंघाने संयोजकांना दिल्या आहेत. दहा वैयक्तिक, तर आठ सांघिक क्रीडा प्रकारात खेलो इंडिया ही स्पर्धा होणार आहे.**

अखिल भारतीय विद्यापीठ महासंघातर्फे आंतरविद्यापीठ स्पर्धांचा कार्यक्रम जाहीर होतो. त्यानुसार विभागीय आणि विद्यापीठ अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक बनविले जाते. यंदा शंभरहून अधिक क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. काही क्रीडा प्रकार थेट आंतरविभागीय स्तरावर, तर बहुतांश खेळ विभागीय स्तरावर खेळले जातील. पुरुषांच्या पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धा शिवाजी विद्यापीठात होतील. आंतरविभागीय कबड्डी भुवनेश्वरला आहे.

पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठात पुरुषांच्या बॅडमिंटन आणि महिलांच्या व्हॉलीबॉल व हॅण्डबॉल स्पर्धा, नांदेडला महिलांच्या कबड्डी, नागपूरला महिलांच्या क्रिकेट, जळगावला महिलांच्या टेबल टेनिस स्पर्धा होतील. मुंबई विद्यापीठाला यंदा पश्चिम विभागीयसह अखिल भारतीय आंतरविभागीय फुटबॉल आणि खो-खोच्या स्पर्धांचे यजमानपद दिले आहे.

# विद्यापीठाच्या संरक्षक भिंतीवर रेखाटले जाणार कोल्हापूरचे वैभव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शहराच्या सौंदर्यीकरणासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न केले जात आहत. शहराच्या सौंदर्यामध्ये वाढ करण्यासाठी शिवाजी विद्यापीठानेही पुढाकार घेतला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संरक्षक भिंतीवर कोल्हापूरचे वैभव रेखाटण्यात येणार असून, त्यासाठीच्या संकल्पना शिवाजी विद्यापीठाने जनतेतून मागवल्या आहेत.

शहर सौंदर्य उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या संरक्षक भिंतीवर कोल्हापूरची संस्कृती रेखाटण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या जुन्या पुणे-बेंगलोर रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीचा वापर शहर सौंदर्यासाठी करण्यात येणार आहे. या भिंतीवर कोल्हापूर शहराची वैशिष्ट्ये, शिक्षण, कला, क्रीडा, संस्कृती, पर्यावरणपूरक संकल्पना, यात्राविषयक, पर्यटनविषयक, वारसास्थळे, स्वच्छता, सामाजिक संदेश अशा विविध कल्पनांचे कलात्मक सादरीकरणाद्वारे समाजप्रबोधनात्मक भित्तीचित्रे साकारली जाणार आहेत. त्यामुळे शहाराच्या सौंदर्यामध्ये भर पडणार आहे; मात्र ही चित्रे रेखाटण्यापूर्वी त्या चित्रांविषयीच्या संकल्पना लोकांमधून मागवण्यात आल्या आहेत. त्यामध्ये विद्यार्थी, नागरिक, शौक्षणिक संस्था, कला संस्था प्रस्ताव देऊ शकतात. ए-थ्री आकाराच्या कागदावर आपली संकल्पना रेखाटून ती विद्यापीठामध्ये जमा करावयाची आहे.